महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर

ता. वाळवा, जि. सांगली. पिन - ४१५ ४०९

स्थापना : १९६१



फोन : कार्यालय -(०२३४२)२९९४७२

E-mail : kbpisl_comp@yahoo.co.in / kbpislampur@gmail.com

Reaccredited by NAAC with 'A' Grade ( CGPA 3.17)

ज्युनि. कॉलेज कोड- २२.११.००१ ज्युनि. कॉलेज मान्यता क्रमांक : एच.एस.सी./१९७६-८१९७२-ए (एस. वाय.) दि. ०७/०५/१९७६

प्रा.(डॉ.) नितीन शिंदे

M.Sc.,M.Phil.,Ph.D.

प्राचार्य

जा. क्र. दिनांक : / /२०२

## “वार्षिक क्रीडा स्पर्धा अहवाल २०२५-२६”

दि. ३० डिसेंबर २०२५ ते ०९ जानेवारी २०२६ अखेर आपल्या कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील कर्मवीर महोत्सव अंतर्गत वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये कबड्डी (मुले,मुली), व्हॉलीबॉल (मुले,मुली), बॅडमिंटन (मुले,मुली) व बुद्धिबळ (मुले,मुली), रस्सीखेच (मुले, मुली) व मैदानी स्पर्धा अशा एकूण पाच क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा यामध्ये घेण्यात आल्या. कॉलेजमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा चालू झाल्याचे हे चौथे वर्ष, स्पर्धा घेण्याचा “उद्देश विद्यार्थ्यांचा खेळातील सहभाग वाढविणे व स्पर्धेच्या माध्यमातून हेल्थ फिटनेस विषयी जागृती निर्माण करणे होय.” याप्रसंगी स्पर्धेचे वेळापत्रक वाचून दाखवण्यात आले, यातील मैदानी स्पर्धा या राजारामबापू पाटील इन्डोअर ट्रॅकवर घेण्यात आल्या व उर्वरित स्पर्धा आपल्याच कॉलेजमध्ये होतील असे सांगितले. स्पर्धेचे उद्घाटन कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, ज्युनियर विभागाचे उपप्राचार्य प्रा. संतोष पाटील, आय. क्यु. एस. सी. समन्वयक डॉ. एस. के. माने, सिनियर कार्यध्यक्ष डॉ. संदेश जिरगे, ज्युनियर कार्याध्यक्ष्य प्रा. एन. पी. टीबे, प्रा. व्ही. ए. होनमोरे, प्रा. जे. बी. चव्हाण-पाटील, जिमखाना विभागाचे डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. सायली जाधव जिमखाना विद्यार्थी प्रतिनिधी देवेंद्र लोळगे हे उपस्थित होते. डॉ.अमितराज माने यांनी कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात स्पर्धेविषयी माहिती दिली, त्यांनी या स्पर्धेत एकूण नोंदवलेल्या सांघिक व वैयक्तिक खेळाडूंची संख्या सांगितली. मुलांच्या कबड्डीमध्ये एकूण १४ संघांनी तर मुलींमध्ये एकूण ०६ संघांनी सहभाग नोंदवला आहे. मुलांच्या व्हॉलीबॉल स्पर्धेत एकूण १५ संघांनी सहभाग नोंदवला आहे. रस्सीखेच स्पर्धेत मुलांच्या १५ संघांनी मुलींच्या ०७ संघांनी सहभाग घेतला. वैयक्तिक क्रीडा प्रकारात बुद्दीबळ मध्ये एकूण ३२

खेळाडू विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे, बँडमिंटन स्पर्धेत एकूण ४७ विद्यार्थांनी सहभाग घेतला, तसेच कॅरममध्ये ४५ मुले मुलीनी सहभाग नोंदविला तर मैदानी स्पर्धेत एकूण १२० मुले –मुली खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे अशी माहिती आपल्या प्रास्ताविकामध्ये दिली.

कार्यक्रमाचे उद्धाटक कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदशन केले व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व अजून विद्यार्थ्यांची खेळातली संख्या सहभाग वाढला पाहिजे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी मनोगतामध्ये जिमखाना विभाग व संयोजन समितीमध्ये उत्साहाने सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच या वार्षिक क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या त्याचबरोबर खेळामुळे होणारे फायदे व मिळणाऱ्या संधी याविषयी मार्गदर्शन केले. आपल्या कॉलेजला खेळाची मोठी परंपरा आहे त्या अनुषंगाने शालेय व विद्यापीठ स्पर्धेत विविध स्तरावर विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन प्राविण्य मिळवावे व कॉलेजचे नाव उंचवावे असे आवाहन देखील केले.

या उद्घाटन प्रसंगी सुरुवातीला स्पर्धेत सहभागी झालेल्या संघाच्या कर्णधारांनी तहसील कार्यालयाशेजारील असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून क्रीडा ज्योत प्रज्वलित करून कॉलेजमध्ये आणण्यात आली व ती क्रीडा ज्योत मा. प्राचार्यांकडे सुपूर्त केली. तसेच संघातील सर्व खेळाडूंनी संचालानाद्वारे उद्धाटन ठिकाणी एकत्रित झाले. उपस्थित सर्व विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय सेवक यांनी टाळयांच्या गजरात या सर्व खेळाडूंचे स्वागत केले व सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

या क्रीडा स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ महात्मा फुले शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माननीय प्रशांत वाजे व माननीय विशाल पाटील यांच्या हस्ते घेण्यात आला. यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ पी व्ही गायकवाड उपप्राचार्य डॉ संदीप पाटील ज्युनिअरचे उपप्राचार्य प्रा संतोष पाटील, प्राध्यापक एस आर नांगरे, प्राध्यापिका सौ स्मिता पाटील प्राध्यापिका सौ सीमा परदेशी कॉलेजची विद्यार्थी प्रतिनिधी सायली जाधव हे उपस्थित होते.

या वार्षिक क्रीडा स्पर्धेमध्ये कबड्डी व्हॉलीबॉल, रस्सीखेच या सांघिक क्रीडा प्रकारांचा तर बॅडमिंटन, बुद्धिबळ कॅरम व मैदानी स्पर्धा इत्यादी वैयक्तिक क्रीडा प्रकारांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या पहिल्या तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी बक्षीस म्हणून देण्यात आली. या स्पर्धेचे

वैशिष्ट्य म्हणजे सांघिक खेळातील प्रत्येक संघाला एक विद्यार्थी मार्गदर्शक मेंटोर देण्यात आला होता त्या विद्यार्थी मार्गदर्शकाच्या माध्यमातून त्या संघाला वेळोवेळी प्रोत्साहन देण्याचे कार्य जिमखाना विभागाच्या वतीने करण्यात आले. महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय सेवक यांच्याही स्पर्धा यावेळी घेण्यात आल्या. त्यांचाही प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या संघांना बक्षीस देण्यात आले. या क्रीडा स्पर्धेच्या बक्षीस वितरणाबरोबरच विविध कौशल्य विकास स्पर्धेच्या निमित्ताने आयोजित स्पर्धेचा बक्षीस समारंभ घेण्यात आला.

एकंदरीत संपूर्ण स्पर्धेचे व बक्षीस वितरणाचे आयोजन जिमखाना विभागाचे डॉ अमितराज माने, डॉ संदीप पाटील, प्रा. कमलेश ठाकरे, अजित पाटील यांच्यासह जिमखाना समितीतील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक वर्ग तसेच कॉलेजच्या विद्यार्थी परिषदेच्या सर्व सदस्यांमार्फत करण्यात आले.

या सर्व क्रीडा स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कोलेजच्या जिमखाना विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अमितराज माने, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, प्रा. कमलाकर ठाकरे यांच्यासह जिमखानाचे प्रशासकीय कर्मचारी अजित पाटील, जिमखाना समिती सदस्य यांच्यासह विद्यार्थी मंडळाचे सर्व विद्यार्थी सदस्य यांनी तसेच सर्व विद्यार्थी मेंटोरनी परिश्रम घेतले.

## वार्षिक क्रीडा स्पर्धा २०२५-२०२६

## -: संघ संख्या व खेळाडू संख्या :- सिनिअर विभाग

| अ. क्र | खेळ | खेळाडूंची संख्या |
|---|---|---|
| १ | कबड्डी (मुले) | ६ संघ = ७२ |
| २ | कबड्डी (मुली ) | २ संघ = १६ |
| ३ | व्हॉलीबॉल (मुले ) | ७ संघ = ८४ |
| ४ | बॅडमिंटन (मुले) | १४ |
| ५ | बॅडमिंटन ( मुली) | १० |
| ६ | बुद्धिबळ (मुले व मुली) | १२ |
| ७ | कॅरम (मुले) | १० |
| ८ | कॅरम (मुली) | ९ |
| ९ | रस्सीखेच (मुले व मुली) | १२ संघ = ११२ |
| १० | मैदानी स्पर्धा (मुले व मुली) | १२० |
| **एकूण सहभागी विद्यार्थी=** | | **४१३** |

## वार्षिक क्रीडा स्पर्धा २०२५-२०२६

## -: संघ संख्या व खेळाडू संख्या :- ज्युनिअर विभाग

| अ. क्र | खेळ | खेळाडूंची संख्या |
|---|---|---|
| १ | कबड्डी (मुले) | ८ संघ = ८० |
| २ | कबड्डी (मुली ) | ४ संघ = ४८ |
| ३ | व्हॉलीबॉल (मुले ) | ८ संघ = ९६ |
| ४ | बॅंडमिंटन (मुले) | २२ |
| ५ | बॅंडमिंटन ( मुली) | १४ |
| ६ | बुद्धिबळ (मुले व मुली) | १६ |
| ७ | कॅरम (मुले) | १ ५ |
| ८ | कॅरम (मुली) | १६ |
| ९ | रस्सीखेच (मुले व मुली) | १० संघ = १०८ |
| १० | मैदानी स्पर्धा(मुले व मुली) | १२१ |
| **एकूण सहभागी विद्यार्थी =** | | **५३६** |

K.B.P. COLLEGE, ISLAMPUR Estd. 1961

PRINCIPAL
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist.Sangli. 415 409

# वार्षिक क्रीडा स्पर्धा २०२५-२६
## उद्घाटन समारंभ














# वार्षिक क्रीडा स्पर्धा २०२५-२६
## बक्षीस वितरण समारंभ



